पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ९

**सभावृत्तांत**

दिनांक - **१९/०१/२०१६** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **१९/०१/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सौ.स्वाती प्रमोद साने - सभापती**
२. मा.जाधव साधना रामदास
३. मा.चोंधे आरती सुरेश
४. मा.भालेकर अरुणा दिलीप
५. मा.बारणे निलेश हिरामण

या शिवाय मा.दंडवते – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.भोसले - कार्यकारी अभियंता, मा.शिंपी - नगररचनाकार, मा.तुपसाखरे - उपअभियंता, मा.ऐवले - समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.४) प्रभाग क्र.६ मधील संजय गांधीनगर झोपडपट्टीमधील अंतर्गत रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे या कामाच्या वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत - मा.आरती चोंधे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ०५/०१/२०१६ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक ८)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ३९ विषय क्रमांक – ०१
दिनांक – १९/०१/२०१६ विभाग - नगररचना व विकास
सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.निलेश बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/पिं.गुरव/टे-८/६८८६/२०१५, दि.०१/१०/२०१५

विषय - मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.७९ पैकी व ८० पैकी जागेत आरक्षण क्र.३५६, “ प्राथमिक शाळा विस्तार ” चे जमिनीचे भूसंपादन करणेबाबत ...

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ४०   विषय क्रमांक – ०२

दिनांक – १९/०१/२०१६

सुचक – मा.आरती चोंधे   अनुमोदक – मा.अरुणा भालेकर

संदर्भ – मा.आरती चोंधे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव –

विषय - आरक्षणातील क्षेत्र रहिवासी विभागात समाविष्ट करणेबाबत...

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१   विषय क्रमांक – ०३

दिनांक – १९/०१/२०१६

सुचक – मा.निलेश बारणे   अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/पिं.नि./९/९५२/२०१६, दि.०७/०१/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मौजे पिंपळे निलख भागाची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, यांचेकडील अधिसुचना क्रं.टीपीएस-१८९३/१२७६/सी.आर-१७४/युडी-१३. दि.१८/०९/१९९५ अन्वये शासनाकडुन मंजुर करणेत आली आहे. सदर विकास योजनेनुसार मौजे पिंपळे निलख येथील स.नं. २७ व २८ मध्ये ४५.०० मी.रूंद रस्ता, २४.०० मी.रूंद रस्ता, आरक्षण क्र.३८८ व ३८९ शॉपिंग सेंटर व या शॉपिंग सेंटर आरक्षणा लगत १२.०० मी. रूंद रस्ता प्रस्तावित केलेला आहे.सद्यस्थितीमध्ये स.नं. २७ व २८ मधून जाणा-या नाशिक फाटा – वाकड या बीआरटीएस रस्त्याचे काम पुर्ण झालेले आहे.तसेच वाकड – वाय जंक्शन - औंध या २४.०० मी. रूंद रस्त्याचे कामही पुर्ण झाले आहे.सध्या सदर भागाचा विकास झपाट्याने होत आहे.सदर ठिकाणचे आरक्षण क्र.३८८ व ३८९ शॉपिंग सेंटर हे आरक्षण विकसित करणेकरीताही १२.०० मी.रस्त्याची अत्यंत आवश्यकता आहे.तसेच वाहतुकीच्या नियोजनाच्या दृष्टीने नाशिक फाटा – वाकड हा बीआरटीएस ४५.०० मी. रूंद रस्ता व वाकड – वाय जंक्शन - औंध या २४.०० मी. रूंद रस्ता हे दोन्ही रस्ते १२.०० मी.रूंद डी.पी. रस्त्याने जोडणे आवश्यक आहे. तसेच मा.नगरसदस्यांची वारंवार मागणी आहे की मौजे पिंपळे निलख येथील स.नं.२७ व २८ मधील १२.०० मी. रूंद रस्त्याची जागा लवकरात लवकर मनपाने ताब्यात घेऊन विकसित करावा म्हणजे ४५.०० मी. व २४.०० मी. रूंद रस्ते जोडले जाऊन वाहतुकीच्या दृष्टीने उपयुक्त होईल.तसेच सदर रस्त्यालगत असणारे शॉपिंग सेंटरचे आरक्षणही विकसित करता येईल. तरी सदर रस्त्याचे जागेच्या भुसंपादनाचा प्रस्ताव तयार केलेला असुन सदर भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठवावा लागणार आहे. सदर भुसंपादन प्रस्ताव पाठविणे कामी मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. केंद्र शासनाने “The Right to fair compensation and Transparency in land acquisition ,Rehabilitation Resettlement Act 2013” हा नविन भूसंपादन कायदा तयार केला असून दि.०१/०१/२०१४ पासुन सदरचा कायदा अंमलात आला आहे.तरी उपरोक्त प्रस्तावित आरक्षणाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व नविन भूसंपादन कायदा अन्वये संपादन करणेकामी सदर आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ४२ विषय क्रमांक – ०४

दिनांक – १९/०१/२०१६

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर

संदर्भ – मा.आरती चोंधे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.६ मधील संजय गांधीनगर झोपडपट्टीमधील अंतर्गत रस्ते हॉट मिक्स पध्दतीने डांबरीकरण करण्याचे काम सन २०१३-१४ चे दरपत्रकाप्रमाणे निविदा क्र.१/१८-२०१४-१५ निविदा र.रु.१४,९३,९००/- काढण्यात आले आहे. सदर काम २.९० टक्के कमी दराने मे.अजवाणी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना मिळाले आहे. सदर कामातून संजयनगर झोपडपट्टीतील पश्चिमेकडील रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले आहे. तथापि स्थानिक सदर झोपडपट्टीत ड्रेनेजचे काम करण्यात आले असल्याने सदर रस्ते देखील डांबरीकरण करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने नगरसदस्यांचे मागणीनुसार इतर रस्ते डांबरीकरण करावयाचे झाल्यास वर नमुद कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करुन सदर सुधारित कामास प्रशासकीय मान्यता घ्यावी लागेल. सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रकीय र.रु.४०,००,०००/- (अक्षरी र.रु.चाळीस लाख फक्त) ला प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सौ.स्वाती प्रमोद साने )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३८/२०१६
दिनांक : १९/०१/२०१६

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.